महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ८८ वे | दिनांक : २१/०३/२०२६ | वार : शनिवार

## 'महाराष्ट्र धर्म स्वातंत्र्य विधेयक' संविधानविरोधी; प्रकाश आंबेडकरांचा जोरदार हल्लाबोल



**पुणे** :राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात विधानसभेने महाराष्ट्र धर्म स्वातंत्र्य विधेयक २०२६ मंजूर केले. हे विधेयक मांडत असताना विरोधकांनी याला जोरदार विरोध केला होता. तसेच हे विधेयक एका समाजाला टार्गेट करत असल्याचा देखील आरोप करण्यात आला होता. आता यावर वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी ट्विट करत टीका केली आहे.

प्रकाश आंबेडकर म्हणाले, धार्मिक धर्मांतरांना आळा घालण्यासाठी महाराष्ट्र विधानसभेने मंजूर केलेले 'महाराष्ट्र धर्म स्वातंत्र्य विधेयक, २०२६' हे कायदेशीर कसोटीवर टिकणार नाहीये. कारण ते संविधानाच्या तत्त्वांचे उल्लंघन करते. ज्या राज्यांमध्ये अशा प्रकारचा कायदा स्वीकारला गेला आहे, तिथेही त्याला कायदेशीर आव्हानांचा सामना करावा लागत आहे. गेल्या आठ वर्षांत, नऊ राज्यांनी ज्यापैकी बहुतांश राज्यांमध्ये भाजपचे सरकार आहे, तिथे हिंदू महिलांचे सक्तीचे विवाह आणि धर्मांतर रोखण्यासाठी, तसेच कथित 'लव्ह जिहाद'ला आळा घालण्यासाठी अशाच प्रकारचे कायदे मंजूर केले आहेत.

पुढे प्रकाश आंबेडकर म्हणाले, हे प्रकरण उच्च न्यायालय किंवा सर्वोच्च न्यायालयासमोर प्रलंबित आहे. महाराष्ट्राच्या बाबतीत बोलायचे झाल्यास, सत्ताधारी भाजपच्या बहुमतामुळे या विधेयकाला विधानसभा आणि विधानपरिषदेत मंजुरी मिळू शकते. परंतु, त्याहूनही मोठा प्रश्न हा आहे की, हे विधेयक कायदेशीर कसोटीवर टिकेल का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

भारतीय संविधानाने धर्माबाबत व्यक्तीला वैयक्तिक अधिकार प्रदान केले आहेत. संविधानाने व्यक्तीला विवाहाचा अधिकारही दिला आहे. त्यामुळे, कोणत्याही बहाण्याने या मूलभूत अधिकारांवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा कोणताही कायदा कायदेशीर आणि घटनात्मक वैधतेच्या कसोटीवर टिकणार नाही. अशा प्रकारचे कायदे संविधानाच्या मूलभूत तत्त्वांचे उल्लंघन करतात, अशी टीका प्रकाश आंबेडकर यांनी केली.

हा कायदा म्हणजे भाजपचा 'राजकीय अजेंडा' असल्याचा आरोप प्रकाश आंबेडकर यांनी केला. ते म्हणाले, समाजाचे हिंदू-मुस्लिम किंवा हिंदू-ख्रिश्चन असे ध्रुवीकरण करून आपली व्होट बँक मजबूत करण्यासाठी भाजपकडून असे प्रयत्न केले जात आहेत. जर एखाद्या व्यक्तीवर जबरदस्तीने धर्मांतर करण्यासाठी अन्याय किंवा अत्याचार होत असेल, तर त्यासाठी सध्याचे कायदे पुरेसे आहेत. पीडित व्यक्ती पोलीस ठाण्यात जाऊन एफआयआर दाखल करू शकते. त्यामुळे या नवीन आणि कडक कायद्याची गरज नव्हती. त्या कायद्या आडून आरएसएस-भाजपला धार्मिक ध्रुवीकरण करायचे आहे. भाजपला जातीय अजेंडा जिवंत ठेवायचा असल्याची टीका आंबेडकरांनी केली आहे.

## महाराष्ट्र काँग्रेसचा मुख्यमंत्र्यांना संतप्त सवाल; आणखी किती उपद्व्याप पाहायचे?

**मुंबई** : काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी भोंदूबाबा अशोक खरात व राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्यातील कथित संबंधांवरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर तिखट हल्ला चढवला आहे. रुपाली चाकणकरांवरील आरोप अत्यंत गंभीर स्वरूपाचे आहेत. महिला आयोगाच्या अध्यक्षपदासारख्या अत्यंत जबाबदारीच्या पदावरील व्यक्तीने तंत्रमंत्राच्या नादी लागून स्वतःची अनामिका कापणे हे अत्यंत दुर्दैवी आहे. राज्यातील अनेक महिलांना गुंगीचे औषध देऊन त्याचे लैंगिक शोषण करणाऱ्या भोंदूबाबा अशोक खरातला नाशिक पोलिसांनी अटक केली आहे. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी या खरातची पाद्यपूजा केल्याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. यामुळे त्यांच्यावर टीकेची झोड उठली आहे. त्यातच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी चाकणकरांवर तंत्रमंत्रांसाठी खरातच्या साक्षीने स्वतःची अनामिका कापल्याचा आरोप केल्यामुळे एकच खळबळ माजली आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा साधला आहे.हर्षवर्धन सपकाळ शुक्रवारी म्हणाले, देवेंद्र पंतांच्या सहकाऱ्यांचे अजून काय काय उपद्व्याप बघायचे आहेत या पुरोगामी महाराष्ट्राने? रुपाली चाकणकर यांच्यावर झालेले आरोप अत्यंत गंभीर स्वरूपाचे आहेत. हे जर खरे असेल तर, महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यात महिला आयोगाच्या अध्यक्षपदासारख्या अत्यंत जबाबदारीच्या पदावरील व्यक्तीने तंत्रमंत्राच्या नादी लागून अनामिका कापणे, हे अत्यंत दुर्दैवी आहे. त्यातच आता सौ. रुपाली चाकणकर या फरार असल्याच्या बातम्या येत आहेत. राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी त्यांची महिला आयोगाच्या अध्यक्षपदावरून त्वरित हकालपट्टी करावी. त्यांच्यावर गुन्हा नोंदवून कायदेशीर कारवाई करण्यात यावी. त्यांनी अशोक खरात च्या माध्यमांतून आणखी काय काय अघोरी कृत्य केले, महिलांवर झालेले अत्याचार, सापडलेले व्हिडिओ, धमकावून खंडणी मागणे या प्रकरणातही रूपाली चाकणकर यांचा सहभाग आहे का, हे ही तपासण्यात यावे. ही प्रवृत्ती सरकारने वेळीच ठेचायला हवी, असे ते म्हणालेत.

## महिला आयोगात मोठा बदल? खरात प्रकरणानंतर चाकणकरांच्या गच्छंतीची चर्चा



**मुंबई** : नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात आता एक मोठी माहिती समोर आली आहे. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची त्यांच्या वर्षा निवासस्थानी भेट घेतली. या भेटीदरम्यान झालेल्या सविस्तर चर्चेनंतर, मुख्यमंत्र्यांनी चाकणकर यांना तात्काळ आपल्या पदाचा राजीनामा देण्याचे आदेश दिल्याची माहिती मिळत आहे. या आदेशामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून, खरात प्रकरण आता चाकणकरांच्या पदावर बेतल्याचे स्पष्ट होत आहे. मात्र, अद्याप राजीनामा दिल्याची अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

शेकडो महिलांच्या लैंगिक शोषणाचे आरोप असलेल्या अशोक खरातसोबत रुपाली चाकणकर यांचे काही फोटो आणि व्हिडिओ समाजमाध्यमांवर प्रचंड व्हायरल झाले होते. या गंभीर प्रकरणामुळे राज्यभरातून त्यांच्यावर टीकेचा भडीमार होत होता आणि विविध राजकीय स्तरांतून त्यांच्या राजीनाम्याची आग्रही मागणी केली जात होती. महिलांच्या हक्कांचे संरक्षण करणाऱ्या आयोगाच्या अध्यक्षपदावर असूनही अशा वादग्रस्त व्यक्तीसोबतचे संबंध समोर आल्याने निर्माण झालेल्या नैतिक पेचप्रसंगामुळे अखेर सरकारने हा कठोर निर्णय घेतल्याचे बोलले जात आहे.

रोहित पवार यांनी ट्विट करत म्हटले की, मुख्यमंत्री साहेबांनी महिला आयोगाच्या अध्यक्षांना राजीनामा देण्याचे आदेश दिल्याचे समजत आहे, याबाबत मुख्यमंत्र्यांचे आभार, परंतु केवळ राजीनामा घेऊन चालणार नाही तर या प्रकरणाच्या तळाशी जाऊन पारदर्शक चौकशी करावी आणि आ. अमोल जी मिटकरी म्हणत असल्याप्रमाणे अजितदादांच्या अपघाताशी या भोंदू बाबाचे कनेक्शन आहे का? याचाही तपास व्हायला हवा.

## प्रा.प्रसाद बेळमकर "गेट " परीक्षेत उत्तीर्ण



**उमरगा : (प्रा.नागसेन कांबळे)** येथील प्राध्यापक आणि श्रीकृष्ण महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी प्रसाद बेळमकर यांनी नुकत्याच आय.आय.टी मार्फत फेब्रुवारी महिन्यात घेण्यात आलेल्या गेट परीक्षेत घवघवीत यश संपादन केले. सध्या ते श्रीकृष्ण महाविद्यालयात तासिका तत्वावर गणित विषयाचे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. गुलाब राठोड यांच्या हस्ते त्यांचा यथोचित गौरव आणि सत्कार करण्यात आला. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक,प्राध्यापकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी आवर्जून उपस्थित होते. प्रा.अरविंद राठोड,प्रा.राजेंद्र पात्रे,प्रा.शंकर चव्हाण,प्रा.सूर्यकांत कोडे यांनी त्यांचे विशेष कौतुक करीत भावी वाटचालीस त्यांना शुभेच्छा दिल्या.राष्ट्रीय पातळीवर यश संपादन करून महाविद्यालयास नावलौकिक मिळवून दिल्यामुळे परिसरात सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २१ मार्च २०२६


## तालुकास्तरीय वर्ड चॅम्पियन्स स्पर्धा उत्साहात संपन्न




**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय, जिंतूर येथे तालुकास्तरीय वर्ड चॅम्पियन स्पर्धा उत्साहात व सर्वांच्या सहभागाने शिस्तबद्ध पद्धतीने संपन्न झाली. माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद परभणी श्रीमती नतिशा माथुर यांच्या संकल्पनेतून वर्ड चॅम्पियन स्पर्धा संपूर्ण परभणी जिल्ह्यामध्ये राबवल्या जात आहे. विद्यार्थ्यांची इंग्रजी विषयाची शब्द संपत्ती वाढावी, इंग्रजी विषयाच्या कौशल्याचा विकास व्हावा, इंग्रजी विषयाची विद्यार्थ्यांना आवड निर्माण व्हावी या उद्देशाने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धा शब्द अंकुर, शब्द विकास आणि शब्दप्रभाव या तीन गटांमध्ये तर शाळा स्तर, केंद्र स्तर, तालुका स्तर व जिल्हा स्तर या चार स्तरांमध्ये संपन्न होणार आहेत. जिंतूर तालुक्यात सर्वात प्रथम शाळा स्तरावर सदरच्या स्पर्धा घेण्यात आल्या. शाळा स्तरावर विजयी झालेल्या स्पर्धकांची केंद्र स्तरावर स्पर्धा घेण्यात आली. केंद्र स्तरावर विजयी झालेले स्पर्धक तालुकास्तरीय वर्ल्ड चॅम्पियन स्पर्धेमध्ये सहभागी झाले. तालुकास्तरीय स्पर्धेचे अतिशय शिस्तबद्ध नियोजन सर्व विद्यार्थ्यांना स्पर्धेचा उत्तम अनुभव देण्याच्या उद्देशाने करण्यात आले. या स्पर्धेसाठी गटशिक्षणाधिकारी त्र्यंबक पोले, शिक्षण विस्तार अधिकारी तथा तालुकास्तरीय नोडल अधिकारी वर्ड चॅम्पियन स्पर्धा केशव घुगे, शिक्षण विस्तार अधिकारी दिलीप रेंगे, डी. यू राठोड, शैक्षणिक उपक्रम समन्वयक मयूर जोशी, वर्ड चॅम्पियन्स स्पर्धा समन्वयक जगदीश चिंचोले, योगिता संगवई, यांनी चांगल्या प्रकारचे नियोजन केले. स्पर्धेतील सर्व फेऱ्यांच्या परीक्षणासाठी भारत पांचाळ, माधव गडदे, संदीप आंबेकर, सचिन हजारे, अनिल स्वामी, प्रवीण भिसे, अरविंद दवणे, श्रीकांत दायमा, प्रमोद बोरकर यांच्यासह सर्व परीक्षकांनी पारदर्शक आणि नि:पक्षपातीपणे परीक्षणाचे काम पूर्ण केले. या स्पर्धेत शब्द अंकुर (३ री ते ५ वी) गटात प्रथम क्रमांक १.श्रावणी बाबासाहेब चिंधे , २. श्रेयस बाबासाहेब चिंधे जि.प.के.प्रा.शा. कन्या बोरी द्वितीय क्रमांक १.स्वरा गोविंद कांदे, २.स्वरा सिद्धार्थ असले जि प प्रा शा सोरजा तृतीय क्रमांक १.ईश्वरी गजानन मुंढे, २.प्राची रवी आघाव, जि प प्रा शा बेलखेडा, शब्द विकास ( ६ वी ते ८ वी ) गटात प्रथम क्रमांक १. अदिती अंकुश पारवे, २. अक्षरा सुहासराव देशपांडे, जि प प्रशाला दुधगाव द्वितीय क्रमांक १.आनंदी गोपाळराव हरकळ , २. प्रिया दीपक राठोड, जि.प.के.प्रा.शा. कन्या बोरी, तृतीय क्रमांक १. साक्षी भगवान शेळके, २. दिव्या संतोष अंभोरे, जि प प्रा शा येसेगाव शब्द प्रभाव (९ वी ) गटात प्रथम क्रमांक १. वेदिका शंकर उन्हाळे, २. श्रुती संतोष काळे, जि प प्रशाला दुधगाव, द्वितीय क्रमांक १. समिधा शरद महाजन, २. गायत्री ताराचंद बारवकर जि प प्रशाला कौसडी तृतीय क्रमांक १. रेणुका लक्ष्मण जावळे, २. शबनम शेख रियाज, जि प प्रशाला बोरी यांनी मिळवला. या स्पर्धकांना जिल्हास्तरीय स्पर्धेत सहभागी होता येणार आहे.




मराठी साहित्य विश्वातील सुप्रसिद्ध "पानिपत" कादंबरीचे लेखक श्री. विश्वास पाटील यांच्याशी मराठी साहित्यातील ऐतिहासिक कादंबरी लेखनाबाबत चर्चा करताना महाराष्ट्र जनशक्तीचे जालना जिल्हा प्रतिनिधी प्रा.डॉ. राजेंद्र सोनवणे.

## बोगस आदिवासींवर कारवाईची मागणी, रिक्त पदे भरण्याचा आग्रह




**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** आदिवासी समाजाच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत तहसील कार्यालय कन्नड येथील तहसीलदार यांमार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांना निवेदन सादर करण्यात आले.धनगर,बंजारा यांना अनुसूचित जमातीमध्ये आरक्षण देवू नये त्याचबरोबर शिक्षण ,रोजगार , शिष्यवृत्ती, जमिनीचे हक्क,बोगस आदिवासी, शासकीय पदभर-ती, छत्रपती संभाजीनगर येथे आदिवासी अप्पर आयुक्त कार्यालय सुरु करण्यात यावे. निवेदनात नमुद करण्यात आले की, महाराष्ट्र राज्यातील आदिवासी समाज हा सामाजिक, शैक्षणिक, आर्थि-कदृष्ट्या अजूनही मागासलेला आहे आदिवासींच्या घटना-त्मक हक्कांवर गदा येतांना दिसत आहे .आदिवासींचे आरक्षण बंजारा, धनगर जातींना देवू नये बंजारा समाजासाठी (ST) आरक्षण अभ्यास गट समिती संदर्भातील शासन निर्णय (GR) तात्काळ रद्द करण्यात यावा आणी त्या समितीवर आदिवासी विकास विभागाचा कोणताही निधी खर्च करण्यात येवू नये.२५ फेब्रुवारी २०२२ च्या शासन निर्णयामुळे अनुसूचित जमातीचा बिंदू २ वरुन ८ वर गेल्याने आदिवासी समाजावर अन्याय झालेला आहे.त्या नियमावलीत दुरूस्ती करावी,यासोबत बोगस आदिवासी विरोधात कठोर कारवाई करावी, १२,५०० विशेष पदभरती सह सुमारे ८५ हजार रिक्त पदे भरावीत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती तातडीने जमा करावी.तसेच वैधता प्रमाणपत्र रद्द होणाऱ्यावर कारवाई करुन त्यांच्या जागी पात्र आदिवासी विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा.पंडीत दिनदयाळ योजनेतील ४० हजार मर्यादा रद्द करुन सर्व विद्यार्थाना सरसकट लाभ देण्यात यावा व योजना ग्रामीण भागातही सुरु करावी अशी मागणी केली. त्याचबरोबर या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्याचा ईशाराही देण्यात आला. यावेळी सह्याद्री आदिवासी म ठाकुर - ठाकर समाज उन्नती मंडळ महाराष्ट्र राज्य या संस्थेचे अध्यक्ष सरिचंद दोरे, उपाध्यक्ष दुबळीराम पथवे, सचिव विठ्ठल मेंगाळ, सल्लागार, सुधाकर मेंगाळ तसेच पांडू कडाळे, सखाराम भुतांबरे सनिराम गावंडे, राजेंद्र आगिवले,रतन मधे, नामदेव पथवे व आदिवासी ठाकर समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता.

## बसवराज पाटील यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार



**मुरुम (प्रा.सुधीर पंचगल्ले) :** महाराष्ट्र टॅलेंट सर्च परीक्षा २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या विविध स्पर्धा परीक्षेत आदर्श विद्यालय उमरगा येथील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार माजी मंत्री तथा लातूर भाजपा ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. 1)कु.खुशी राठोड इयत्ता सातवी ही उमरगा तालुका प्रथम श्रेणी एम टी एस परीक्षा राज्यात २२ वी.2) कुमारी सायना राठोड येत असावी उमरगा तालुक्यात सहावी राज्यात तीसावी.3) चिरंजीव सुभान पटेल इयत्ता चौथी वर्गा तालुक्यात सातवा तर राज्यात तिसावा.4) चिरंजीव वेदांत गायकवाड सैनिक स्कूल साठी पात्र विद्यार्थी 5) आयुष मुळे व शुभांगी सूर्यवंशी या सैनिक स्कूल साठी पात्र विद्यार्थी या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र टॅलेंट सर्च परीक्षा मध्ये यश मिळवल्याबद्दल आज यथोचित सत्कार करण्यात आला. या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केलेले सहशिक्षक प्रशांत सोमवंशी सहशिक्षिका सौ.सुवर्णा चौधरी. प्राचार्य सैपन शेख. पर्यवेक्षक श्रीपाद कुलकर्णी आदींनी मार्गदर्शन केले श्रमाजीवी शिक्षण संस्थेच्या सर्व संचालकांनी त्यांचे अभिनंदन केले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २१ मार्च २०२६

## निसर्गाचा अनमोल वारसा जपणारा अवलिया: सिल्लोडचे शिक्षक अशोक कुमावत यांचा ३५ वर्षांचा 'पक्षी बचाव' यज्ञ



**सिल्लोड** : आजच्या धावपळीच्या आणि सिमेंटच्या जंगलात जिथे माणसाला माणसासाठी वेळ उरलेला नाही, तिथे सिल्लोड शहराचे रहिवासी आणि आदर्श शिक्षक श्री. अशोक सांडू कुमावत (M.A. B.Ed.) यांनी निसर्ग संवर्धनाचा एक वेगळाच आदर्श घालून दिला आहे. गेल्या ३५ वर्षांपासून 'चिमणी वाचवा' अभियानांतर्गत ते अविरतपणे पक्षी आणि वन्यजीवांसाठी कार्य करत आहेत.'थोडेसे दाणे, थोडेसे पाणी': उपक्रम नव्हे, तर एक चळवळकुमावत सरांनी "थोडेसे दाणे, थोडेसे पाणी" हा अत्यंत सोपा पण प्रभावी उपक्रम आपल्या घरापासून सुरू केला आहे. त्यांच्या घराच्या परिसरात त्यांनी पक्ष्यांना दाणे खाण्यासाठी आणि पाणी पिण्यासाठी ठिकठिकाणी कुंड्या व पात्रांची व्यवस्था केली आहे. यामुळे दररोज सकाळी त्यांच्या घरी चिमण्या, साळुंक्या, भारद्वाज आणि अनेक दुर्मिळ पक्ष्यांचा मेळा भरतो. हे पक्षी आता कुमावत कुटुंबाचा एक अविभाज्य भाग बनले आहेत.केवळ पक्षीच नव्हे, तर वन्यप्राण्यांचेही कैवारीअशोक कुमावत यांचे प्रेम केवळ घरगुती पक्ष्यांपुरते मर्यादित नाही. ते एक कट्टर प्राणीप्रेमी असून त्यांनी माकडे आणि इतर जंगली प्राण्यांच्या संवर्धनासाठीही मोठे पाऊल उचलले आहे.पाणवठ्यांची निर्मिती: वाढत्या उन्हाळ्यात जंगली प्राण्यांना पाण्यासाठी भटकंती करावी लागू नये म्हणून त्यांनी परिसरात पाणवठ्यांची सोय केली आहे.अन्न सुरक्षा: माकडांच्या टोळ्यांना नैसर्गिक अन्न मिळावे आणि त्यांनी मानवी वस्तीत येऊ नये, यासाठी ते प्रयत्नशील असतात.घरट्यांची उभारणी आणि संवर्धनशहरीकरणामुळे झाडे कमी झाली आहेत, परिणामी पक्ष्यांच्या निवाऱ्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. हे ओळखून कुमावत सरांनी पक्ष्यांना अंडी घालण्यासाठी आणि सुरक्षित राहण्यासाठी नैसर्गिक व कृत्रिम घरट्यांची सोय केली आहे. चिमण्यांसारख्या लहान पक्ष्यांची संख्या पुन्हा वाढावी, हा यामागचा मुख्य उद्देश आहे.ठळक वैशिष्ट्ये:समाजप्रबोधनाचा वारसाएक शिक्षक म्हणून काम करताना त्यांनी शेकडो विद्यार्थ्यांना निसर्गप्रेमाची गोडी लावली आहे. "निसर्ग वाचला, तरच मानव वाचेल," हा संदेश ते आपल्या कृतीतून समाजाला देत आहेत. त्यांच्या या ३५ वर्षांच्या तपस्येमुळे आज सिल्लोड परिसरात पक्ष्यांचा किलबिलाट टिकून आहे."पक्षी आणि प्राणी निसर्गाचा समतोल राखतात. आपण फक्त त्यांना थोडे अन्न आणि पाणी दिले तरी ते आनंदाने जगू शकतात. प्रत्येकाने आपल्या घराच्या गच्चीवर किंवा अंगणात एक पाण्याचे पात्र ठेवावे, हीच खरी निसर्गसेवा आहे."— अशोक सांडू कुमावत, पक्षीप्रेमी शिक्षक

## जोगवाडा शिवारात विजेचा कहर; बैल ठार, शेतकऱ्याचे ७० हजारांचे नुकसान



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर)** : जिंतूर तालुक्यातील जोगवाडा शिवारात अवकाळी पावसासह झालेल्या विजेच्या कडकडाटामुळे एका शेतकऱ्याचा बैल ठार झाल्याची दुर्दैवी घटना घडली. ही घटना दि. १९ मार्च रोजी सायंकाळी सुमारे ७ वाजण्याच्या सुमारास घडली.मिळालेल्या माहितीनुसार, जोगवाडा येथील गट क्रमांक १३८ मधील शेतकरी हरिभाऊ आंबाजी वाळके यांच्या शेतात हा प्रकार घडला. अचानक आलेल्या अवकाळी पावसामुळे परिसरात विजांचा कडकडाट सुरू झाला आणि त्यातच वीज कोसळून त्यांच्या बैलाचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे शेतकऱ्याचे अंदाजे ७० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे.घटनेची माहिती मिळताच महसूल विभागाच्या वतीने तलाठी भीमराव वाकळे, महसूल सेवक योगेश शिंदे, पोलीस पाटील पि. पि. वाकळे यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. यावेळी विद्यमान प्रशासक संजय अंभोरे तसेच माजी उपसरपंच सुनील मस्के हेही उपस्थित होते.अवकाळी पावसामुळे आधीच अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांवर या घटनेमुळे आणखी आर्थिक संकट कोसळले आहे. त्यामुळे नुकसानग्रस्त शेतकरी हरिभाऊ वाळके यांनी प्रशासनाकडे तात्काळ आर्थिक मदत देण्याची मागणी केली आहे.दरम्यान, परिसरात सतत बदलणाऱ्या हवामानामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून, शासनाने अशा आपत्तीग्रस्तांना त्वरित मदत करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडूनही होत आहे.

## माळीवाडा येथे स्वयंभू महादेव - चैतन्य कानिफनाथ यात्रेला उत्साहात सुरूवात



**दौलताबाद (जावेद अहमद)** : भव्य संगीतमय श्री शिवमहापुराण कथा छत्रपती संभाजीनगरपासून सुमारे १३ कि.मी. अंतरावर असलेल्या माळीवाडा गावात स्वयंभू महादेव व चैतन्य कानिफनाथ महाराजांची पारंपरिक यात्रा मोठ्या उत्साहात सुरू झाली आहे. सुमारे २०४ वर्षांची परंपरा लाभलेल्या या यात्रेला यंदाही भाविकांचा मोठा प्रतिसाद लाभत आहे.यात्रेनिमित्त शिवपुराण कथेला सुरुवात ह.भ.प. कैलासजी महाराज खनसे यांच्या वाणीतून सुरवात झाली. गुढीपाडव्याच्या प्रतिपदेच्या दिवशी सकाळी महादेव मंदिरात विधिवत पूजा करून मंदिरासमोर महाल उभारण्यात आला. सुमारे ३० फूट उंच बांबू (काठी) सजवून त्यावर महादेवाची पितळी प्रतिमा प्रतिष्ठापित करण्यात आली. भाविकांनी मोठ्या श्रद्धेने दर्शन घेऊन पूजा केली.गुढीपाडव्याच्या दिवशी सायंकाळी अंबिलच्या घागरी आणून त्यांची पूजा करण्यात आली. यावेळी ५१ अंबिल घागरींची पूजाअर्चाना करून आरती करण्यात आली व अंबिलचा प्रसाद सर्व भक्तांना वाटण्यात आला.गुढीपाडव्याच्या तिसऱ्या दिवशी, शनिवारी रात्री १२ वाजल्यापासून मुख्य यात्रेला प्रारंभ होणार आहे . या दिवशी बाभळीच्या 'काटेरी काठ्या' या पारंपरिक भक्त मोठ्या उत्साहाने सहभाग घेत उड्या मारून आपली नवस श्रद्धा व्यक्त करतात.दि. २२ रोजी रविवारी भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले असून, मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. यात्रेनिमित्त संपूर्ण गावात धार्मिक व भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.शंकर भगवान व चैतन्य कानिफनाथ मंदिरावर विद्युत रोषणाई करण्यात आले.

प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए
मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103

## रिकामे घर सतावते

कधीकाळी घरात माझ्या,
बोबडे बोल घुमत होते.
पीठ दळतांना घरात,
गरगर फिरत होते जाते.

जात्यावरची ओवी ऐकून,
लेकरं गुणगुणत होते गाणे.
दूध आणण्यास जातांना,
ग्लासमध्ये वाजत होते नाणे.
शिकून सवरून लेकरं,
शहराकडे निघून गेले.
सदा हसतं खेळतं घर,
कायम रिकामे घर केले.

रिकामे घर सतावते,
आता मायाबापला खूप.
लेकरं शहरात गेल्यामुळे,
बदलले आता घराचे रूप.
लेकराविना घर आता,
उदास उदास वाटते.
भर दिवसा आईबापाचे,
स्वप्न उरामध्ये फाटते.

भेटायला येतील मुलं म्हणून
मायबाप आशेवर जगतात
डोळे लावून शहराकडे
मुलं येण्याची वाट बघतात

**- नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २१ मार्च २०२६


## चांदोमामा चांदोमामा

चांदोमामा चांदोमामा
तू गोरा गोरा पान
आमच्या गच्चीवरून
दिसतोस किती छान

रात्रभर फिरून
जातोस लांब लांब
दमला असशील
थोडा तरी थांब

ढगाआड लपून
खेळतोस तू लपंडाव
डाव आला कि मात्र
पळून जातोस राव

आपण दोघं मिळून
लांब लांब फिरू
ढगांशी खोड्या करुन
मौज मस्ती करू

घरी ये जेवायला
वाढीन तूप रोटी
भूक नाही म्हणून
थाप नको खोटी

अमावस्येच्या रात्री
मारू नकोस दडी
नाहीतर तुझ्या हाती
देईन एक छडी!


**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६




# रखरखत्या उन्हातपशु पक्षी प्राणी साठी निस्वार्थ सेवा करणारा अवलिया : भारत दराडे





**दौलताबाद (जावेद अहमद) :** कडक उन्हात प्राणी पशु पक्षी च्या अन्न- दाना-पानी साठी चाललेली व्रतस्ती व्यक्तिमत्वाची धडपडदिवसेंदिवस तापमाण वाढत आहे. जंगलातील नैसर्गिक पाणसाठे अटत चालले आहे. परिणामी जंगलातील मुके पशु -प्राणी पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करताना दिसत आहे.अशातच मिटमिटा -जटवाडा डोंगरातील जंगली मुके पशु प्राणी यांनाही कडक उन्हात पाणी मिळवण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. यात सुसर, हरीण, मुंगुस, घुबड, घार, घुले, साळुंकी,उदबिल्ले, राणमांजर, रान बोक्या, ससे, मोर इत्यादी पशु पक्षी पाण्याच्या शोधात दिसत आहेमिटमिटा येथिल प्राणी पशु पक्षी मित्र असलेले आणि जंगलाबाबात आस्था असणारे भारत आसाराम दराडे हे आपल्या नित्य दैनिंनंदिन कार्यभारातून वेळ काढत त्यांच्या अन्न दाना पाणीची व्यवस्था करत आहे. नि:स्वार्थ, निरपेक्षपणे ते हा यज्ञ मागील अकरा वर्षांपासून करत आहे. ते दरवर्षी उन्हाळ्यात स्वखर्चातून आपल्या कमाईतला काही भाग काढतात व त्यातून ते मुक्या प्राण्या पशु पक्षी साठी पाणी हौद, टँकर द्वारे जंगलात पाणी उपलब्ध करून देत आहे त्यामुळे असंख्य पशु पक्षी प्राणी यांची पाण्यासाठी होणारी भटकंती थांबलीदराडे यांनी जंगलात भरून ठेवलेलया हौदावर असंख्य प्राणी पशु पाणी पिताना दिसतात.यांनी आपल्या घराला प्राणी पशु शाळा बनविलेले आहे. घराच्या गच्चीवर, झाडावर चिमण्या घर करून राहत आहे. दररोज सकाळ सायंकाळी चिमण्यांचा चिवचिवाट ऐकाला मिळतो. दराडे यांनी जंगलात पाणी थंड राहावे म्हणून विशेष प्रकारचे साडे पाच बाय तीन आकाराचे सिमेंट ची हौद व कुंड्या तयार करून घेतले व त्याद्वारे ते जंगलात पशु पक्ष्याच्यासाठी पाण्याची व्यवस्था करत आहे हा नित्यक्रम ते कधीही चुकू देत नाही.दराडे यांना दोन मुले एक मुलगी असून पती पत्नी व मुलांना सोबत घेऊन ते हे कार्य करत आहे. तीन महिन्याला दीड क्विंटल धान्य, तीन टँकर पाणी लागत असते. प्रत्येक महिन्याला स्वतःच्या कमाईतून महिण्याकाठी दोन हजार रुपये ते मागे टाकतात त्यांच्या या निरपेक्ष कार्याची प्रेरणा इतरांनी घेऊन कार्य केलं तर जंगलातील पशु प्राणी पक्षी यांचे पाण्याअभावी होणारे मृत्यचे प्रमाण व तडफड थांबेल आणि मानवीय नैसर्गिक अधिवासातील प्राणी पशु पक्षी यांचे संवर्धन होऊन नैसर्गिक साखळी अबाधित राहण्यास मदत होईल.इतिहास संशोधक डॉ शिवाजी गायकवाड यांनी सांगितले पाणी आडवा पाणी जिरवा तसेच सामाजिक संस्था व वनविभागाने याकडे लक्ष केंद्रित करून पाणवठे व पक्षासाठी दानापाणी उपलब्ध करून दिली पाहिजे चिमणी ही शेतकरी साठी वरदान आहे पिकावरील किटके हया खाऊन घेतात व पर्यावरण संरक्षण होते.

## कवितेच्या हिंदोळ्यावर 'मराठी कवितांच्या अभिवाचन मैफलीचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर :** ध्यास गझल समूह,टेरेसवरील कविता परिवारातर्फे 'जागतिक महिला दिनानिमित्त ' कविता लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होती.त्यास कवयित्रींचा राज्यभरातून प्रचंड प्रतिसाद मिळाला.ह्या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ,रविवार दिनांक २२ मार्च २०२६ रोजी,जीवन विकास ग्रंथालयाचे ग्रंथमित्र भा. बा. आर्वीकर सभागृह येथे संध्याकाळी ५ ते ७ या वेळेत संपन्न होणार आहे.यासोबतच 'कवितेच्या हिंदोळ्यावर ' ही दर्जेदार मराठी कवितांची अभिवाचन मैफल रंगणार आहे.ह्यात आघाडीच्या कवयित्री अंजली दीक्षित,कल्याणी कोळपकर,कस्तुरी कुलकर्णी,मृणाल देशपांडे ,रूपाली पाटील,संध्या फुलपगार कवितांचे अभिवाचन करणार आहेत. कु.अबोली झोळगीकर कविता /गीतांचे गायन करणार आहे.कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सुप्रसिद्ध ज्येष्ठ बालसाहित्यिक प्रा.लीला शिंदे असणार आहेत.तसेच प्रमुख अतिथी म्हणून सुप्रसिद्ध कवयित्री रसिका देशमुख,प्रिया धारूरकर,अमिता पैठणकर उपस्थित असतील.सदरील कार्यक्रम मोफत असून कविता रसिकांनी कार्यक्रमास यावे असे आवाहन कार्यक्रमाचे संयोजक श्री .गिरीश जोशी,श्रीमती.मृणाल देशपांडे ह्यांनी केले आहे.

# कोळवाडी परिसरात बिबट्याचे पुनरागमन; एका दिवसात दोन जनावरांचा बळी, जंगलालगत भीतीची छाया




**कन्नड (अरुण थोरात) :** कोळवाडी ता. कन्नड शिवारातील शेतात बिबट्याने अवघ्या चोवीस तासात दोन पाळीव जनावरांची शिकार केल्याने पशुपालकांत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.कोळवाडी शिवारात गट क्र. १०३ मधिल शेतकरी नामदेव सयाजी नागरे यांच्या शेतातील गोठ्यात बांधलेल्या तीन वर्षे वयाच्या गोर्ह्याची बिबट्या ने शिकार केली. चोवीस तास उलटत नाहीत तोच कोळवाडी शिवारातील गट क्र. १९५ मधिल शेतकरी भरत बाबुराव जाधव यांच्या पारडी ची बिबट्याने शिकार केली. ही बाब दि. २० मार्च रोजी पशुपाल काच्या लक्षात आली.यामुळे पशुपालकांत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. यागोदर जानेवारी महिन्यात येथील गट क्र. १४६ मधिल शेतकरी तुळशीराम तोताराम जाधव यांच्या पाळीव जनावरांची शिकार झाली होती. महिना दोन महिन्याच्या अंतराने या शिकारी होत असल्याने शेतकरी त्रस्त झाले आहे. कोळवाडी- सितानाईक तांडा शिवारालगत घनदाट जामडी फारेस्ट, कळंकी जंगल असल्याने अनेकांना बिबट्याचे दर्शन झाले आहे.